VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मराठी साहित्य वरील प्रभाव

**प्रा.डॉ.जयदेवी माणिकराव पवार**
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगाव

प्रज्ञासूर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ही काळाच्या पुढे असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवतावादाचा भूमिकेतून खर्ची घातले आहे. संशोधक म्हणू नये त्यांचे कार्य फार मोलाचे आहे केळूसकर सरांनी लिहिलेल्या गौतम बुद्धाच्या चरित्राचा प्रभाव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरा वर पडला होता. गौतम बुद्ध चार्वाक महात्मा फुले संत कबीर हे आंबेडकरांनी वाचून काढले होते. त्यांना ते गुरु मानतात. गुरुनानक ,महात्मा बसवेश्वर, महात्मा चक्रधर, संत तुकाराम यांच्या इहवादी व विद्रोही विचारांचा अभ्यास त्यांनी केला. हे त्यांच्या चिंतनाचे विषय होते. विज्ञाननिष्ठा, समाजवादी विचारसरणी बुद्धिप्रामाण्यवाद, मानवतावाद यांचा अभ्यास केला व तो आचरणात आणला. त्यांनी अनेक शास्त्रांचा, कायद्याचा ,धर्मशास्त्राचा अभ्यास करून त्यातून त्यांनी त्या ज्ञानाचा उपयोग वर्णव्यवस्था ,जातिभेद, स्त्रीदास्य ,विषमता यांच्यातील परिवर्तनासाठी केला. ही व्यवस्था परमेश्वराने निर्माण केलेली नसून ही मानव निर्मित आहे. असे सिद्ध केली. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग 'संत तुकारामाच्या वचनाप्रमाणे त्यांनी स्वतःच्या समाजाच्या व राष्ट्राच्या उद्धारासाठी त्यांनी केलेला संघर्ष काळाने नोंद घेण्यासारखा आहे. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. हे कार्य त्यांच्या अगोदर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे , महात्मा फुले, राजश्री शाहू , महात्मा गांधी , संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, यांनी केले होते. संपूर्ण जगात काळा गोरा हा वर्णभेद आहे पण तिथे अस्पृश्यता नव्हती. भारतात मात्र स्पश अस्पृश्यता जात भेद वर्णभेद यातून माणसाला गुलाम बनविले जाते. गुलामांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी बाबासाहेबांनी मानव मुक्तीचे म्हणजेच मानवतावादाची कार्य वेगवेगळी वृत्तपत्र काढून हाती घेतली. मूकनायक, बहिष्कृत हितकारणी सभा, जनता यातून त्यांनी मराठी भाषेतून लेखन केले. धार्मिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, संस्कृतिक , या अंगाने लेखन करून समाजात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ग्रंथ निर्मिती केली' हू वेअर द शुद्ध राज, 'आनिहिलेशन ऑफ कॉस्ट, 'या ग्रंथातून समा जाबद्दल ची विचारसरणी मांडली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाची स्थापना केली. यातून प्रेरणा घेऊन दलित साहित्य चळवळ उदयास आली. दलित साहित्य चळवळ ही आंबेडकरांच्या प्रेरणेतून वाटचाल करू लागली आंबेडकरांकडे

VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

पाहताना घटना तज्ञ समाज सुधारक दिन दलितांचे उद्धारक स्त्रियांचे रक्षक अशा भूमिकेतून साहित्यिक पाहू लागले. समाज सुधारक हा त्या त्या काळाची आव्हाने साहित्यातून आविष्कृत करत असतो . साहित्य या कले कडे सर्वांगीण सकारात्मकतेने पहात असतो. अनेक संत विचारवंत तत्त्ववेत्ते यांनी जो वैचारिक संघर्ष मांडला तो समाज उपयोगी होता. कारण वैचारिक संघर्ष हा सर्जनशील असला तर तो नवनिर्माण करू शकतो. त्यातून पुरोगामित्व, मानवतावादी दृष्टी प्रसवत असते.

ज्या महात्मा गौतम बुद्धांनी जगाकडे नवनिर्माणाच्या जग बदलण्याच्या भूमिकेने पाहिले अर्थात त्यांना चांगला समाज निर्माण ण् कसा करता येईल हा ध्यास होता. कारण बुद्धाची दृष्टी नवे मार्ग नवे विचार नव्या सवयी शोधल्या जात त् नाहीत तोपर्यंत तो समाज जिवंत राहण्याची शक्यता नसते. ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला मान्य होऊ शकत नाही असे आंबेडकर चातुर वर्णव्यवस्थेच्या बाबत म्हणत होते. ब्राह्मण क्षेत्रीय वैश्य शूद्र यात कामाची विभागणी जन्मावरून वाटून दिली होती ती ती त्यांना मान्य नव्हती. व्यक्तिविकास व्यक्तिस्वातंत्र्य समता बंधुता न्याय हे त्यांचे यांचे होते व चिंतनाचा विषय होता. डॉक्टर बाबासाहेबांनी साहित्यिकांना आव्हान केले की, मला साहित्यिकांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवन मूल्य आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा, आपले लक्ष मर्यादित ठेवू नका तर ते विशाल करा, आपली वाणी चार भिंती पूर्ती राहू देऊ नका नंतर तिचा विस्तार होऊ द्या तिचे तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवृत्तीत करा. आपल्या देशात उपेक्षितांचे दलितांचं फार मोठे जग आहे हे विसरू नका त्यांचं दुःख त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटणयात खरी मानवता आहे. यातून दरीचा विषयीची तळमळ व उपलब्ध असलेल्या मराठी साहित्याची कोतेपण, अधुरे पण त्यांना जाणवत असले पाहिजे साहित्य आणि आणि समाजाचा नि.संदिग्ध संबंध असला पाहिजे. उत्कृष्ट साहित्यकृतीचा मानदंड त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यांचा साहित्याकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन होता असे म्हणता येते. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव हा वेगवेगळ्या साहित्यिकांच्या साहित्यातून दिसून येतो. त्यांनी प्रज्ञा शील करुणा या बुद्धांच्या सूत्रांचा वापर केला होता. मानवजात इथून तिथून एकसमान आहे. कोणी श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असू शकत नाही. तेव्हा सर्वांना समान संधी समान न्याय मार्गाचा अवलंब केला पाहिजे खरेतर साहित्याची प्रेरणा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, वैचारिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक, चळवळ ही दलित साहित्याच्या मुळाशी आहे. डॉक्टर आंबेडकरांनी दलितांमध्ये आपल्या विचार व कृतीने अस्मिता जागविण्याचा प्रयत्न केला त्यांच्यातील माणूस जिवंत करून माणूस पण दिले एक निश्चित दिशा दिली. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव अनेक समकालीन व 1960 नंतरच्या प्रवाहावर पडलेला दिसतो. त्यात सानेगुरुजी शंकरराव

खरात योगीराज वाघमारे चंद्रकांत वानखेडे रविचंद्र हडसनकर अविनाश डोळस असे असंख्य साहित्यिक आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन साहित्यनिर्मिती करीत आहेत. 1967 नंतर

अस्मिता दर्शन मधून दलित साहित्य चळवळीला गती प्राप्त झाली. याच दरम्यान अनेकांनी कथा कविता आत्मकथन कादंबरी लेखन याला सुरुवात केली. याच काळात सानेगुरुजी वर गांधी विचारांचा प्रभाव होता तसा सर्जनशील साहित्यिक म्हणून डॉक्टर बाबासाहेबांचा ही प्रभाव पडलेला पाहायला मिळतो. रामाचा शेला ही कादंबरी 1944 सालि प्रकाशित झाली या कादंबरीचा नायक उदय हा आंबेडकरी विचाराने झपाटलेला पाहावयास मिळतो. आई द्वारकाबाई आपल्या मुलासाठी मालकिन बाईकडून अंगात घालण्यासाठी कोट आणते. आईने आणलेला कोट उदय शाळेत घालून जातो तेव्हा मालकीण बाई चा मुलगा बंडू उदय कडे पाहून आपल्या मित्रांना म्हणतो की, त्या उदयचा कोड बघा तो बावळटासारखा दिसतो आहे...... लग्नाचा कोट की काय.... अरे त्याच्या आईने वाढत्या अंगाचा शिवला असेल म्हणजे पुन्हा पुन्हा शिवायला. पण स्वाभिमान कोठे आहे?"१, यावर उदय बंडूला खूप मारतो. आईला म्हणतो मी हा कोट घालणार नाही. त्यावर द्वारकाबाई उदयला मारते बंडूची आईची माफी मागायला लावते. पाया पडायला लावते परंतु उदय मात्र अगदी निश्चयाने म्हणतो की, मार मला वाटते तितके मार मी माफी मागणार नाही. कोणाच्या पाया पडणार नाही... जीव गेला तरी नाही पडणार... खोट कशाला आणलास,? कशाला भीक मागितली? मी फाटक आकोट का घालीत नव्हतो?.....आई माझ्यासाठी कुणाकडे काही मागू नकोस!"२ हाऊ दय चा विचार म्हणजे 27 सप्टेंबर 1927 रोजी महाड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातील विचारांचा प्रभाव होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार माणूस कोणत्याही धर्माचा, विचारांचा असो, गरीब असो वा श्रीमंत असो त्यांनी स्वाभिमान जागृत ठेवला पाहिजे स्वाभिमाना शिवाय जीवन व्यर्थ आहे. हे उदयच्या वरील वाक्यातून लक्षात येते.

रामाचा शेला या कादंबरीतील सेवक राम अस्पृश्यांच्या परिषदेत हजर होतात व भाषणात म्हणतात की तुम्ही जागृत झालात जो जागत है वोपावत है|तुमचा उद्धार आता जवळ आला आहे•तुम्ही राम मंदिरात प्रवेश मिळवा म्हणून सत्याग्रह ह् करीत आहात ठीक आहे•पण मला असे वाटते की मंदिरात शिरण्यासाठी कशाला धडपड तेथे आज देव नाही पावित्र्य नाही तेथे घाण आहे मूर्ती म्हणजे खूण आहे•ईश्वराची एरवीही कल्पना करता येत नाही? कशाला तेथे जाता; तुम्ही याहून थोर धर्म घ्या .मंदिरातील मूर्ती एक खोल कल्पना आहे. विशाल आकाशाच्या खाली कोठेही वसा क्षणभर डोळे मिटा व जगाच्या चालकाला प्रणाम करा. उत्साही व्हा पुन्हा आपल्या कामाला लागा. ज्या धर्माने माणूस म्हणून जवळ केले नाही. तो त्या धर्माच्या नावाने शंख करीत रडण्यापेक्षा ज्या धर्मात माणुसकी शील, चारित्र्य, संघटन, शिस्त,

सौजन्य याचा सर्वव्यापी लाभ संपादन करता येईल, अशा बौद्ध धर्माचा डॉक्टर आंबेडकरांनी लाखो आणूयाया सोबत स्वीकार केला. हाच विचार रामाचा शेला या कादंबरीच्या नायकाच्या म्हणजेच उदयच्या बोलण्यातून येतो आहे. चंद्रकांत वानखेडे यांनी 'आपुलाचि वाद आपणाशी 'या आत्मकथनातून आंबेडकरी विचारांच्या प्रभावातून लेखन केले आहे. लेखक बहुजन समाजातील आहेत. पण त्यांच्यावर आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव आहे. इसवी सन 1970 ते 2000 या कालावधीत लेखक सक्रीय कार्यकर्ते म्हणून वावरले आहेत. अनेक चळवळीत कामे केली वेगवेगळ्या विचारधारा समजून घेतल्या लेखकाचा पिंड हा स्वाभिमानी आहे. म्हणून ते कार्यकर्ता म्हणून कुठेही शरण जात नाहीत. आपली तत्वे व मूल्य यांना प्रमाण मानून चालतात आत्मकथन आतील घटनाही आणीबाणी काळातील असून 1975 ला इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केली ही घटना स्वातंत्र्यावरील आघात होता हे आंबेडकरांनी दिलेल्या लोकशाही ही स्वातंत्र्य हक्का विरोधी होती. त्याचा अधिकार म्हणून, पोस्टर लावली त्यात त्यात त्यांना तुरुंगवास झाला. 'महाराष्ट्र छात्र युवा संघर्ष 'वाहिनीचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी नामांतर चळवळीत 1979 साली सक्रिय भूमिका घेतली. औरंगाबाद विद्यापीठाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून यासाठी महाराष्ट्रात आंदोलन पेटलं होतं. सहा डिसेंबर 1979 रोजी नामांतर वादी कृती समितीच्या वतीने वानखेडे व त्यांचे असंख्य साथीदार सहभागी झाले व आंदोलन केले स्वतःअटक करून घेतली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचे नेते नव्हते तर या देशातील उपेक्षित वंचित शोषित पीडित त्यांचे नेते होते. म्हणून त्यांच्या नावाला विरोध होणे ही वाईट गोष्ट आहे. असे मत मांडले. निषेध म्हणून अटक करून घेतली. सवर्णांची म्हणे वळविण्यासाठी म्हणून त्यांनी अमरावती ते नागपूर आपल्या अनुयायांसह पायी पदयात्रा करून सवर्णा मध्ये जनजागृती केली तेथेही त्यांना दुसऱ्यांदा अटक झाली होती. तुरुंगात जाणारे लाठ्याकाठ्या खाणारे असे निर्भीड व्यक्तिमत्व म्हणजे चंद्रकांत वानखेडे होय. बाबासाहेबांसारख्या महापुरुषाला अभिप्रेत असलेली सामाजिक समता रुजली नाही. याचा खेद आत्मकथनातून व्यक्त होतो. त्यांचे शेतमजूर, दोन्ही आंदोलने त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केली. शरद जोशींसारख्या शेतकरी संघटनेचा नावाखाली समाजसुधारणेचा बुरखा पांघरून स्वार्थ साधणाऱ्या बेगडी पुढाऱ्याचा समाचार आत्मकथनातून घेतला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी म्हणून डॉक्टर आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक चळवळी व आंदोलने उभारली होती. त्यांचे संसदेतील पहिले भाषण हे शेतकऱ्यांसाठी होते. आत्मकथन आतूनही शेतकऱ्यांच्या कष्टाचे, शोषणाचे, शेतीचे तत्वज्ञानी येते. या आत्मकथनातून सावकार व सरकार ही शोषण व्यवस्था मांडलेली दिसून येते. म्हणजेच लेखकावर डॉक्टर आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. वानखेडे यांनी आपल्या जीवनात ही रूढी, प्रथा, परंपरा ,देव

,दैव याविरुद्ध विद्रोह पुकारला आहे आंबेडकरांनीही रूढी परंपरा नाकारून नव्या मानवतावादी विचारांचा स्वीकार केला होता हाच प्रत्यय आत्मकथनातून येतो. जाती निर्मूलनासाठी म्हणून आंबेडकरांनी आंतरजातीय विवाहांना प्राधान्य दिले होते. यातून जातिभेद नष्ट होईल असे त्यांचे मत होते. वानखेडे यांनी ब्राह्मण जातीतील माया कुलकर्णी या पुरोगामी विचाराच्या तरुणीसोबत विवाह केला विवाहाच्या वेळी परंपरा रूढी यांना नाकारून डॉक्टर आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून असलेला विवाह त्यांनी केला. विवाहानंतर मायाने कपाळाला कुंकु नाही, मंगळसूत्र नाही, हातात बांगड्या नाहीत, असाच साध्या पद्धतीने विवाह केला. आत्मकथनातून पावलोपावली आंबेडकरांच्या विचारांचा प्रत्यय येतो. जेव्हा मी जात चोरली, मरण स्वस्त होत आहे या कथातून आंबेडकरी विचारांचा प्रभाव जाणवतो विद्रोह या कथेत ठासून भरलेला आहे. शिकलेल्या जय नावाच्या भंगी तरुणाच्या तरुणाच्या भावी आयुष्यातील स्वप्नांचा भंग होतो. चातुर वर्णीय व स्पृश्य अस्पृश्य ते मुळेच होतो याचे चित्रण येथे आहे. डॉक्टर आंबेडकरांनी शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा नारा व शिक्षणाचा स्वाभिमानाचा दिलेला मूलमंत्र स्वीकारून देश धर्म संस्कृती याविषयी तो पेटून उठतो. हिंदू धर्माचा धिक्कार करतो तो आपल्या वडिलाला म्हणतो, पिताजी कोणता देश? कोणता धर्म? कोणती संस्कृती? मी भंग याची नोकरी करणार नाही. शिकून मी मी सॉक्रेटिस सारखा, आंबेडकरां सारखा मोठा होईल असे म्हणतो म्हणजेच नायक जय बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावित झालेला आहे याचा प्रत्यय येतो.

**संदर्भ ग्रंथ**

1 कृष्णा किरवले-दलित चळवळ आणि साहित्य-प्रतिमा प्रकाशन पुणे २००६
२ भालचंद्र फडके-दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७७
३ प्रतिभा सो पाटणकर, आंबेडकरी चळवळीचा वारसा, निर्मिती विचार मंच कोल्हापूर २००८
४ योगेंद्र मेश्राम, डॉक्टर आंबेडकरांची वांग्मयीन चिंतन, सुगावा प्रकाशन पुणे २००९